विशेष राज्यकर आयुक्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय
दिनांक 30 JUN 2018
आवक क्र. 763
विराआ/स्वी.स./कर सहायक

## राज्यकर विभाग पुनर्रचना समिती -२०१८ ची स्थापना

**महाराष्ट्र शासन**

वित्त विभाग

**शासन निर्णय- क्रमांक: विकवि १२१८/प्र.क्र ४४/वि.प्र.४**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

**तारीख:- २२ जून, २०१८**

**वाचा:-** **१.** राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे क्र.विकवि-२०११/आस्था-३/पुनर्रचना कक्ष/२०१६/प्र.क्र.८९, दि.१७.०१.२०१८

**२.** राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे क्र.विकवि-२०११/आस्था-३/पुनर्रचना कक्ष/२०१६/प्र.क्र.८९, दि.२२.०३.२०१८

**३.** राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे क्र.विकवि-२०११/आस्था-३/पुनर्रचना कक्ष/२०१६/प्र.क्र.८९, दि.०९.०४.२०१८

**प्रस्तावना :-**

वित्त विभागाच्या दि. ५ मार्च २०१८ च्या आदेशान्वये दि. ३०/०९/२०१८ पूर्वी आस्थापनांवरील पदांचा आढावा घेऊन आकृतीबंधास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता प्राप्त करुन घेण्याबाबत निर्देश दिले आहेत. उक्त पत्रान्वये राज्यकर विभागाच्या पुनर्रचनेबाबत सहाय्य करण्यासाठी अनुभवी सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समितीचे गठन करण्याची विनंती केली आहे. दि.१ जुलै, २०१७ पासून वस्तू व सेवा कर कायदा अंमलात आला आहे. त्याची अंमलबजावणी केंद्र व राज्य अशा व्दिस्तरावर होणार आहे. नव्याने लागू झालेल्या या वस्तू व सेवा कर कायद्याच्या अनुषंगाने भविष्यात निर्माण होणारे काम व त्या अनुषंगाने भविष्यात या विभागास आवश्यक असलेले मनुष्यबळ याचा आढावा घेण्यास तसेच राज्यकर विभागाचा पुनर्रचनेस सहाय्य करण्यासाठी यासाठी "राज्यकर विभाग पुनर्रचना समिती-२०१८" स्थापन करण्याबाबत वस्तू व सेवा कर विभागाने विनंती केली आहे.

**शासन निर्णय** :-

वस्तू व सेवा कर विभागाची पुनर्रचना करण्यासाठी राज्यकर विभाग पुनर्रचना समिती-२०१८ ही आठ सदस्यीय समिती नियुक्त करण्यास व समितीचे अध्यक्ष म्हणून श्री. विजयकुमार अग्रवाल या भारतीय प्रशासकीय सेवेतील सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यास या आदेशान्वये शासन मान्यता देण्यात येत आहे. तसेच समितीवरील इतर ७ सदस्य म्हणून राज्यकर विभागातील ज्येष्ठ व अनुभवी कार्यरत अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याबाबत आयुक्तांना अनुमती देण्यात येत आहे.

राज्यकर सहआयुक्त (मुख्या) ४, म.रा., मुंबई.
यांच्या आस्थापना १, २ आणि ३.
आवक क्र. 328
दिनांक: 2 JUL 2018

१) समितीची कार्यकक्षा :-

१. राज्यकर विभागातील विविध कार्यशाखांमधील एकूण कामाचे मापन (Quantification of Workload) तसेच एकूण कामाच्या वाढीचे (Assess the growth potential) मूल्यमापन करणे.

२. विविध कामे पूर्ण करण्यासाठी लागणारा कालावधी ठरविणे व त्यास अनुसरुन कामाचे निकष ठरविणे.

३. विभागातील कामांचा आढावा घेवून ती पूर्ण करण्यासाठी कार्यशाखानिहाय व अधिकारी संवर्गनिहाय आवश्यक कार्यगट (Model staff units) निश्चित करणे.

४. विभागाचे संगणकीकरण व वस्तू व सेवा कर कायदा विचारात घेवून विभागासाठी योग्य संरचना ठरविणे व त्याप्रमाणे सर्व संवर्गाची पुनर्रचना करुन पदोन्नती साखळीचा शंकू (Pyramid) निर्माण होईल हे पाहणे.

५. पिनकोडनिहाय/ तालुकानिहाय व्यापाऱ्यांची संख्या, जमा महसूल, संगणकीकरण विचारात घेवून विभागीय कार्यालये व क्षेत्रीय कार्यालये यांची पुनर्रचना करणे.

६. केंद्रीय वस्तू व सेवाकर विभागातील संरचना व इतर राज्यातील कर प्रशासनाचा विचार करुन निर्धारणा (Assessment & Adjudication) व अपिले कार्यशाखा कोणत्या संवर्गातील अधिकारी हाताळतील हे निश्चित करावे.

७. नवीन संरचना विचारात घेवून विविध कामांसाठीच्या कार्यशाखानिहाय कार्यपध्दती निश्चित करणे. (Manual of Procedures)

८. कार्यशाखानिहाय प्रत्येक संवर्गाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या (Roles & Responsibilities) निश्चित करणे.

९. विभागातील विविध कार्यशाखांमधील सध्या प्रलंबित असलेला कामाचा आढावा घेणे, सदर कामाच्या निपटाऱ्यासाठीचे मनुष्यबळ निश्चित करणे व ती पूर्ण करण्यासाठी कालमर्यादा आखून देणे.

१०. आवश्यक तिथे कार्यभारांचे एकत्रिकरण (Merger) करणे किंवा विलगीकरण (Demerger) करणे व नवीन संरचनेप्रमाणे निर्माण होणाऱ्या कार्यभारामध्ये प्रलंबित कामे स्थानांतरीत करण्यासाठीची कार्यपध्दती निश्चित करणे.

११. राज्यकर अधिकारी, राज्यकर सहाय्यक आयुक्त व राज्यकर उपआयुक्त यांना वाटप करावयाच्या व्यापाऱ्यांची वर्गवारी निश्चित करणे व प्रत्येक संवर्गातील अधिकाऱ्यांकडे द्यावयाच्या व्यापाऱ्यांची संख्या ठरविणे.

१२. निर्धारणेसाठी निवडावयाच्या प्रकरणांचे निकष व मुद्दे निश्चित करणे.

१३. प्रत्येक संवर्गातील अधिकाऱ्यांसाठी लक्ष्यांक ठरविणे.

१४. आस्थापना अधिकारी व स्वीय सहाय्यक यांच्या मदतीसाठी आवश्यक कर्मचारी संख्या ठरविण्यासाठी निकष ठरविणे.

१५. आयुक्त तसेच विशेष राज्यकर आयुक्त यांच्या कार्यालयातील कामाचा व मनुष्यबळाचा आढावा घेणे.

१६. दक्षता शाखेच्या (Vigilance Branch) कामाचे स्वरुप निश्चित करणे व मनुष्यबळाचा आढावा घेणे. त्याचप्रमाणे खालील बाबींचा विचार करणे.

अ) दिवाणी प्रक्रिया संहिता (C.P.C.) खालील कोणत्या अधिकाराचे (चौकशीसाठी समन्स इ.) प्रदान दक्षता शाखेच्या अधिकाऱ्यांना करावे याबाबत शिफारस करणे.

ब) दक्षता शाखेची पथके (Units) ठाणे, पुणे, व नागपूर येथे स्थापन करण्याबाबत.

१७) सहआयुक्त व अपर राज्यकर आयुक्त यांच्या कार्यालयासाठीच्या मनुष्यबळाचे निकष ठरविणे.

१८) संगणकीकरण साठी In-house IT Team निर्माण करणे, Special Recovery Cell निर्माण करणे, आर्थिक बुध्दिसंपदा कक्षास विश्लेषक सांख्यिकी तज्ञ, संगणक तज्ञ इ. कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्याविषयी शिफारशी करणे.

१९) विधी विषयक बाबी, आस्थापना विषयक बाबी, कायदा व नियम विषयक बाबी, वसुली संदर्भातील क्लिष्ट प्रकरणांबाबत कायदेविषयक सल्ला देण्यासाठी विशेष सल्लागार (Special Advisor) नियुक्त करण्याच्या तरतूदीविषयी शिफारशी करणे.

**२) समितीचा कालावधी :-**

वित्त विभाग आकृती पुनर्रचना कार्यासनाच्या शासन निर्णय दि. ०५.०३.२०१८ च्या मधील निर्देशाप्रमाणे विभागाच्या आकृतीबंधाच्या प्रस्तावास दि. ३०.०९.२०१८ पूर्वी उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. ही बाब विचारात घेवून राज्यकर विभाग पुनर्रचना समितीने तिच्या शिफारशी कळविण्यासाठी समिती स्थापन झाल्यापासून जास्तीत जास्त तीन महिने कालावधी राहील.

**३) समितीवरील सेवानिवृत्त अधिकाऱ्यांबाबत शिफारस व मानधन :-**

राज्यकर विभाग पुनर्रचना समिती-२०१८ चे अध्यक्ष म्हणून श्री. विजयकुमार अग्रवाल या भारतीय प्रशासन सेवेतील सेवानिवृत्त अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात येत असून त्यांना रू.३,००,०००/- इतके एकत्रित पारिश्रमिक देय राहील. सदर समितीवरील इतर ७ सदस्य राज्यकर विभागातील ज्येष्ठ व अनुभवी कार्यरत अधिकारी असल्याने त्यांना वेगळे परिश्रमिक देण्यात येणार नाही. समितीवर अध्यक्ष म्हणून नेमणूक करावयाचे श्री. अग्रवाल हे भा.प्र.से. तील सेवानिवृत्त अधिकारी असल्याने समितीच्या कामकाजासाठी त्यांना आवश्यक सोयीसुविधा (कार्यालयीन जागा, स्टेशनरी व इतर सहाय्य, आवश्यकतेनुसार वाहन सुविधा इ.) पुरविण्यात येऊन इतर अनुषंगीक सहकार्य राज्यकर आयुक्तालयाकडून करण्यात येईल.

वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक विअप्र २०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम भाग-२ दि.१७ एप्रिल २०१५ मधील भाग पहिला, उपविभाग ४ अनुक्रमांक ११ मध्ये नमुद केलेल्या अटींच्या अधीन बाहययंत्रणेकडून घेण्यात येणाऱ्या कामाचा खर्च मंजुर करण्यास प्रशासकीय विभागास पूर्ण अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. सदर आदेश सामान्य प्रशासन विभागाकडील अनौ.संदर्भ क्र. ८० दि. २६/०४/२०१८ अन्वये मिळालेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(वि.द.चुरी)
अवर सचिव, वित्त विभाग

प्रति,

१)राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, वस्तू व सेवा कर भवन, माझगांव, मुंबई-१०.

२) विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, वस्तू व सेवा कर भवन, माझगांव,मुंबई-१०.

वि बे२।

३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई.
४) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
७) वित्त विभाग, प्रशासन-४.
८) निवड नस्ती, विक्रीकर (प्रशा-४).